MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**April To June 2019**
**Issue-30, Vol-03**

**Date of Publication**
**01 May 2019**

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Self attested

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

14) ORIGIN OF THE POLICE
**Dr. G. Sanjeevayya, Andhra Pradesh** ||64

15) डोपिंग विरोधी चळवळ गतीमान करणे काळाची गरज
**डॉ.घायाळ बाबुराव लक्ष्मणराव,नांदेड** ||68

16) कविता गजाआडच्या : स्त्री जाणिवांचा अविष्कार
प्रा.डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र गित्ते,बुलडाणा. ||70

17) डोपिंगमुळे खेळाडूंवर होणारे परिणाम आणि उपाययोजना
**डॉ.जाधव धरमसिंग गेमसिंग,नांदेड** ||74

18) स्त्री दु:खाचा उत्कट उद्गार म्हणजे 'वेदन'
**प्रा. सौ. संगीता नारायणराव मुंढे, हिंगोली.** ||76

19) पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागातील आंतरविवाह ......
**डॉ.संजय ज्ञानोबा सावंत,कोल्हापूर** ||78

20) एकोणिसावे शतक आणि महाराष्ट्रातील दलित चळवळ : एक आकलन
**डॉ.एस.डी. सावंत,लातूर** ||81

21) संत कवयित्रींच्या अभंगाची सामाजिक उपयुक्तता
**डॉ.प्रतिभा सुधीर पेंडके, कु.अर्चना शंकरराव कोहळे** ||87

22) भारतातील उच्च शिक्षण स्वरूप : विवेचन — एक अभ्यास
**प्रा.डॉ.उन्मेश शेकडे, लातूर** ||90

23) विद्यार्थी केंद्रीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा — २०१६
**श्री.संतोष रंगराव शहापूरकर, कोल्हापूर** ||94

24) वडगाव लढाईतील भिवराव पानसे यांची कामगिरी (१७७९)
**प्रा.डॉ.भानुसे कारभारी लक्ष्मण,औरंगाबाद** ||97

25) अमर्त्य सेन यांचे अर्थिक विचार
**प्रा.डॉ.राजेंद्र निंबा बोरसे, लोणार** ||99

26) सोळाव्या लोकसभा निवडणूकीतील माध्यमांची सक्रियता व गतीशीलता आणि ...
**गजानन सहादेव उपरीकर, नागपूर.** ||101

१) तौर पृथ्वीराज- वेदन, प्रस्तावना निर्मल प्रकाशन, नांदेड. चौथी आवृत्ती २०१६ पृ.०८

२) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ५७

३) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. १३

४) किन्हाळकर वृषाली - वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ५५

५) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. १८

६) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ३८

७) किन्हाळकर वृषाली- वेदन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती. २००६ पृ. ६०

८) तौर पृथ्वीराज, वेदन- प्रस्तावना निर्मल प्रकाशन, नांदेड. चौथी आवृत्ती २०१६ पृ.११

❑❑❑

**19**

# पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागातील आंतरविवाह : एक समाजशास्त्रीय अध्ययन'

डॉ.संजय ज्ञानोबा सावंत
स्माजशास्त्र विभाग,
शिवराज महाविद्यालय,गडहिंग्लज
जि.कोल्हापूर

***********

**प्रस्तावना —**

प्रस्तुत अध्ययनात स्वामीरामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात पीएच.डी. प्राप्त प्रबंधाचा सारांश दिला आहे. हा प्रबंध विवाह, नातेदारी आणि कुटूंब या शाखेची संबंधीत आहे. संशोधनाचा उद्देश हा आंतरविवाहित व्यक्तींची विवाहपूर्व आणि विवाहानंतरची वैयक्तिक, वैवाहिक, कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक माहिती त्याच बरोबर आंतरविवाहानंतर त्यांना आलेले अनुभव आणि समस्या अभ्यासणे हा आहे.

**प्रकरण रचना**

प्रस्तुत प्रबंधाची सात प्रकरणांमध्ये विभागणी केलेली आहे.

प्रकरण : १ प्रस्तावना

प्रकरण : २ संशोधन पध्दती

प्रकरण : ३ आंतरविवाहितांची वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभुमी

प्रकरण : ४ आंतरविविहातांची आंतरविवाहानंतरची वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक स्थिती

प्रकरण : ५ आंतरविवाहानंतर आलेले अनुभव

प्रकरण : ६ आंतरविवाहानंतर निर्माण झालेल्या समस्या.

प्रकरण : ७ निष्कर्ष व शिफारशी

पुढील भागात संशोधन प्रबंधाचा प्रकरणानुक्रमे सारांश दिलेला आहे.

प्रकरण १ –

प्रस्तावना

या प्रकरणामध्ये 'विवाहसंस्था' ही एक सामाजिक संस्था' अशी सैध्दांतिक मांडणी करण्यात आली. त्याचबरोबर विवाह संस्थेची कार्ये, विवाहाचे प्रकार, विवाहसंस्थेची उत्पत्ती, विवाहसंबंधी काही नियम, जोडीदार निवडीच्या पध्दती, आंतरविवाहाला प्रोत्साहित करणारे घटक, आंतरविवाहाचे होणारे फायदे, भारतीय समाजातील आंतरविवाहाची ऐतिहासिक पार्श्वभुमी, आंतरविवाहांसबंधी वेळोवेळी झालेले कायदे, विवाहसंस्थेत झालेले संस्थात्मक बदल आणि संदर्भसाहित्याचा आढावा इत्यादी घटकांचे समाजशास्त्रीय विश्लेषण केलेले आहे. १२६ संदर्भग्रंथाची यादी शेवटी दिलेली आहे.

प्रकरण २ संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रबंध प्राथमिक आणि दुय्यम तथ्यांच्या आधारे मांडला आहे. यात संशोधन समस्या व तिचे स्वरूप आंतरविवाहाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितके, संशोधन क्षेत्र यामध्ये पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागाची पार्श्वभुमी, संशोधन आराखडा त्यात नमुना निवड, तथ्य संकलनात प्राथमिक आणि तथ्य, मुलाखत, अनुसूचीची पूर्व तपासणी तथ्य विश्लेषण व सारणीकरण, संशोधन कार्याचे अनुभव, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनात वापरलेल्या विविध संकल्पनाचे स्पष्टीकरण इत्यादी घटकाचा समावेश केलेला आहे.

संशोधनाचे महत्त्व

बहुतांश आंतरविवाह हे प्रेमविवाह आणि पालकांच्या परवानगीशिवाय झालेले दिसून येतात. अशा आंतरविवाहित व्यक्तींची कुटूंब, नातेवाईक, समाजाप्रती असलेली मते व अनुभव समजून घेणे फारच महत्वाचे ठरते. त्याचे कारण असे की प्रत्येक विभागातील आंतरविवाहित व्यक्तिंच्या अनुभवात आणि समस्येमध्ये विभिन्नता आढळून येते. त्यामुळे भारतीय समाजात या अभ्यासाचे समाजशास्त्रीय महत्त्व असल्याचे स्पष्ट होते.

संशोधनाची उद्दिष्टये :

प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित केलेली उध्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत

१. ब्रिटिश राजवटीत सत्तेखाली राहिलेला परंतु स्वातंत्र्योत्तर काळात प्रगत पुरोगामी व आधुनिक विचारांच्या पार्श्वभूमीचा इतिहास असणारा प्रदेश म्हणून ओळखला जाणारा पश्चिम महाराष्ट्र व निजामशाही राजवटीत सरंजामशहीच्या प्रभावाखाली वाढलेला व स्वातंत्र्यानंतर परंपरावादि विचारांच्या पार्श्वभूमीचा इतिहास असलेला मराठवाडा या दोन विभागाची सामाजिक, सांस्कृतीक पार्श्वभुमी अभ्यासणे

२. आंतरविवाह करणाऱ्या व्यक्तिंची विवाहपूर्ण वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभुमी स्पष्ट करणे

३.आंतरविवाहित व्यक्तींच्या आंतर विवाहानंतरच्या कौटुंबिक स्थितीचे वर्णन करणे

४. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या विभागातील आतंरविवाह करणाऱ्या व्यक्तिंना आंतरविवाह केल्यानंतर आलेल्या अनुभवांचे विश्लेषण करणे

५. आंतरविवाहामुळे निर्माण झालेल्या आंतरविवाहितांच्या समस्यांचे वर्णन व विश्लेषण करणे

गृहितकृत्ये (Hypothesis)

१. 'पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा ' या दोन विभागाची ऐतिहासिक जडण–घडण वेगळी असून सामाजिक जीवनाची पार्श्वभुमी देखील वेगवेगळी आहे. पश्चिम महाराष्ट्रापेक्षा मराठवाडा विभाग हा अधिक परंपरावादी आहे.

२. आंतरविवाहितांमध्ये उच्च, मध्यम व कनिष्ठ या सर्वच सामाजिक स्तरातील व्यक्तिंचे अस्तित्व असले तरी मध्यम व कनिष्ठ सामाजिक स्तरातील व्यक्तिंचे प्रमाण अधिक आहे.

३. आंतरविवाहित व्यक्ति या उच्चशिक्षित असुन त्यांची सध्याची आर्थिक परिस्थिती ही उच्च वा मध्यम दर्जाची आहे.

४. आंतरविवाह करणा–या व्यक्तिंचे कौटुंबिक जीवन हे अनेक प्रकारच्या समायोजनातून ( तडजोडीतून) साकार झालेले आहे.

५. 'पश्चिम महाराष्ट्र' आणि ' मराठवाडा ' या विभागातील आंतरविवाह करणाऱ्या व्यक्तिंचे अनुभव वेगवेगळे असुन मराठवाडयाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रातील आंतरविवाह करणाऱ्या व्यक्तिंना कमी प्रमाणात सामाजिक विरोधाला तोंड द्यावे लागते

६. आंतरविवाह करणाऱ्या व्यक्तिंना त्यांचे नातेवाईक, जातीतटातील लोक आणि समाजाकडून सुरूवातीच्या होणा—या विरोधाची तीव्रता कालांतराने कमी होत जाते आणि त्यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण होत जातात.

७. आंतरविवाह केल्यांमुळे आंतरविवाहीत व्यक्तीसमोर निर्माण होणा—या अडचणी व समस्यांची तीव्रता ही त्या त्या विभागातील सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर अवंलबून असते.

**संशोधनाच्या मर्यादा**

१. प्रस्तुत संशोधनास पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागाची भौगोलिक मर्यादा आहे.

२. पश्चिम महाराष्ट्र विभागातील एकूण पाच जिल्हयातून ( पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर प्रत्येकी २० आंतरविवाहांची अध्ययनासाठी निवड केलेली आहे. परंतु मराठवाडा विभागात आठ जिल्हे असल्यामुळे आणि विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्र असल्यामुळे संशोधनास लागणारा दीर्घ कालावधी, संशोधकाची अडचण आणि मर्यादा लक्षात घेता नांदेड, बीड जिल्हयातून प्रत्येकी १०, परभणी आणि हिंगोली प्रत्येकी १०, लातूर आणि उस्मानाबाद प्रत्येकी १० अशी उत्तरदात्यांची निवड ही सहेतूक नमुना निवड पध्दतीनी केलेली आहे.

३. संशोधकाने वस्तुनिष्ठ व विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी प्रत्यक्ष भेटून मुलाखत अनुसूची भरुन घेतली आहे. तरीही साय माहिती लपविली असल्याची असल्याची शक्यता नाकरता येत नाही

**प्रकरण—३**

या प्रकरणात आंतराविवाहिची वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक पाश्वभुमी अभ्यासलेली आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागातील आंतरविवाह करणा—या २०० उत्तरदात्या आंतरविवाहीत व्यक्तींच्या विवाहपूर्ण वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाची पाश्वभूमी स्पष्ट करण्याच्या उध्देशाने या प्रकरणांची मांडणी केलेली आहे. त्या संदर्भात उत्तरदात्या आंतरविवाहीत व्यक्तीकडून अनुसूची तंत्रांचा वापर करुन संदर्भात केलेल्या माहितीचे वर्णन व विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात केलेले आहेत.

**प्रकरण—४**

या प्रकरणात आंतरविवाह केलेल्या व्यक्तींचे वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्याच्या उध्देशाने प्रस्तुत प्रकरणातून केलेले आहे. त्यात आंतरविवाहितांचे आंतरविवाहानंतरचे वास्तव्याचे ठिकाण, सध्याचे वय, शिक्षण, धर्मांतर, व्यवसाय मासिक उत्पन्न, कुटुंबात बोलली जाणारी भाषा, आवड वा छंद, आंतरविवाहाचे स्वरुप, आंतरविवाह करण्याची कारणे, आंतरविवाहाचा उध्देश, मुळकुटुंबाची सहमती मिळण्याची कारण, सहमती न मिळण्याचे कारण, अपत्यांच्या जोडीदाराविषयी आंतरविवाहीतांची अपेक्षा, आंतरविवाहीतांचे प्रमाण कमी असण्याचे कारण, आंतरविवाहीतांचा कुटुंब प्रकार, कुटुंबातील सदस्यांची वयोगटानुसार विभागणी, कुटुंबातील शिक्षितांची सदस्य संख्या, कुटुंबातील कमावते सदस्य, कुटुंबातील सदस्यांचा वैवाहीक दर्जा, कुटुंबातील कुटुंबप्रमुख, कुटुंबातील निर्णय प्रक्रिया, अपत्यांचे जन्माचे ठिकाण, आंतरविवाहातांची अपत्य संख्या, कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेसंर्भात माहिती, अपत्यावर होणारे जातीधर्मांचे संस्कार, अपात्यांची शाळेत करण्यात येणारी जातीविषयक नोंद, जातीच्या नोंदीचे कारण, इत्यादी घटकांचे सविस्तर विश्लेषण केलेले आहे.

**प्रकरण—५**

उत्तरादात्या आंतरविवाहितांना आंतरविवाहिनंतर काय अनुभव आले? कुटुंबातील सदस्यांनी त्यांना स्वीकारले का? त्यांच्याकडे नातेवाईकांचे जाणे — येणे आहे का? समाजात सांस्कृतिक — धार्मिक कार्यक्रमात वावरतांना काय अडचणी येतात? या संबंधीची माहिती संकलित करुन त्या माहितीच्या आधारे आंतरविवाहितांच्या कौटुंबिक — सामाजिक जीवनातील अनुभवासंबंधीची मांडणी प्रस्तुत प्रकरणातून केलेली आहे.

**प्रकरण—६**

या प्रकरणात आंतरविवाहामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे विष्लेशण केलेले आहे. यात आंतरविवाहितांच्या विवाहामुळे कुटुंबातील सदस्यांच्या विवाहाबाबत निर्माण झालेल्या अडचणी, भावंडाच्या विवाह समारंभामध्ये सहभागी केले नसल्याने कारण, कौटुंबिक जीवनात एखादा निर्णय मान्य नसेल तर त्यामुळे जीवनात उदभवणारे संघर्षमय प्रसंग, एकमेकांशी संघर्ष होण्याची कारणे, पती -- पत्नीमध्ये संघर्ष निर्माण

झाल्यास जातीचा उल्लेख होण्याचे प्रसंग, घटस्फोटाचा विचार मनात येत असूनही घटस्फोट न घेण्याची कारणे, स्व:इच्छेविरुध्द स्वीकारलेल्या तडजोडीचे स्वरुप आंतरविवाहामुळे वाटणा—या पष्चातापाची कारणे, आंतरविवाहानंतर उदरनिर्वासाठी केलेल्या आर्थिक व्यवस्थेचे स्वरुप अपत्यांना समवयस्काबरोबर राहत असतांना येणा—या अडचणी, अपत्यांच्या विवाहाबाबत भविष्यात निर्माण होणा—या समस्या, सार्वजनिक कार्यमातील सहभागानंतर येणा—या समस्या जाती — पंचायतीकडून निर्माण झालेल्या समस्या, आंतरविवाहीतांकडे समाजाचा पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोणाचे कारण इत्यादी घटकांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

प्रकरण—७

संशोधन प्रबंधाची मांडणी सात प्रकरणातून केलेली आहे. उध्दिष्ठांना मध्यवर्ती ठेऊन आवष्यक ती माहिती संकलित केलेही आहे. प्रस्तुत प्रबंधामध्ये गृहीतकार्य मांडलेली आहेत तर काही शिफारशीपण केलेल्या आहेत. अशा शिफारसीचा उपयोग नियोजन कर्ते, प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्य करणा—या सेवाभावी संस्थानां निश्चितपणे होऊ शकेल. गृहितकृत्याच्या पडताळीणमध्ये एकूण ७ गृहितकृत्यापैकी सातही गृहीतकृत्य सिध्द झालेली दिसून येतात.

सारांश—

आंतरविवाह करणा—या व्यक्तीस १९५४ मध ये विशेष विवाह कायदा जो १९७२ ला या कायदया मध्ये दुरुस्ती करून नवीन विशेष विवाह अधिनियक १९५४ ला केल्यामुळे शासनाने कायदेशीर मान्यता आणि संरक्षण दिले परंतू आंतरविवाहकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन आजही बदलेला दिसून येत नाही. त्याचे कारण म्हणजे पारंपारिक मानसिकता आणि जातीधर्म समाजरचना होय. आंतरविवाह हे प्रेमाविवाहाबरोबरच पालकांच्या सहमतीने झाल्यास राष्ट्र उभारणीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे योगदान ठरु शकते. त्यामुळे आज आंतरविवाहांची संख्या वाढत असली तरी बहुतेक आंतरविवाह हे प्रेमविवाह असल्याचे दिसून येतात.

❑❑❑

20

# एकोणिसावे शतक आणि महाराष्ट्रातील दलित चळवळ : एक आकलन

डॉ.एस.डी. सावंत
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

************

जातिव्यवस्था आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून अस्पृश्यतेचा जन्म झालेला आहे. जात ही जन्मावर आधारित असल्यामुळे तो बदलण्याचा अधिकार नाही. त्याचबरोबर सर्व जातींना समान दर्जा दिला गेलेला नाही. त्यामुळे समाज एकसंघ राहिला नाही. जन्मावर आधारित समाजात व्यवसायाचे झालेले वाटप या सूत्रामुळे महाराष्ट्रात कनिष्ठ जातीत जन्मलेल्या अस्पृश्य स्त्री—पुरुषांना ज्ञानसंपादन व व्यापा उदीम करण्याचा अधिकार राहिला नाही. त्यामुळे जाती—जातीमधील देवाणघेवाण थांबली. रोटीबंदी आणि बेटीबंदीमुळे समाजास बंदिवासात राहावे लागले. जातिव्यवस्थेमुळे बहुसंख्य समाज ज्ञान घेण्यापासून वंचित राहिला. धर्मग्रंथ पवित्र आहेत ही श्रद्धा दृढ झाल्यामुळे जातिव्यवस्थेला विरोध करणारा हा पाखंड ठरवला जाऊ लागला आणि 'मनुस्मृती'सारख्या ग्रंथानी जातिव्यवस्थेला नियमबद्ध केल्याने व जाती भंग करणाऱ्याला कठोर शिक्षा सांगितल्याने कनिष्ठ जाती आणि स्त्रिया यांच्याशी कठोर व्यवहार करायला ब्राम्हणी व्यवस्था मोकळी झाली. त्याचा परिणाम कनिष्ठ जातीतील लोकांची पिळवणूक मोठ्या प्रमाणात होऊ लागली आणि अशा काळात अस्पृष्यतेसारखी अमानुष पद्धत त्यांच्या स्पर्शातून विटाळ मानणारी समाज व्यवस्थेतील सत्य अशा अस्पृष्य व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी असलेली बंदी, मंदिरामध्ये प्रवेशबंदी, ज्ञान व